**प्रेस नोट** **दि.०६/०७/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

## माथाडीचे नावाखाली खंडणी घेणारे इतर आरोपींना अटक

ॲक्वाचिल सिस्टिम इंडिया प्रा. लि. ही कंपनी इंडस्ट्रीयल एअर कंडीशनर मशीन नवीन किंवा जुन्या इमारतीत बसविण्याचे काम करते. नमूद कंपनीस रूबी हॉल हॉस्पीटल, पुणे येथील सुपर स्पेशालिटी कॅन्सर या इमारतीमध्ये एअर कंडीशनर मशीन बसविण्याचे काम सप्टेंबर, २०१८ मिळालेले आहे.

नमूद कंपनीमधील कामगार यांनी सदर रूबी हॉल हॉस्पीटल, पुणे येथील सुपर स्पेशालिटी कॅन्सर या इमारतीमध्ये एअर कंडीशनर मशीन बसविण्याचे काम सुरू केले. सदर ठिकाणी काम चालू असताना महाराष्ट्र माथाडी संघटनेचे कर्मचारी बाबू ननावरे, गोविंद गायकवाड, गौतम जगदाळे यांनी सदर कामाचे ठिकाणी येवून काम बंद केले व सदरचे काम हे माथाडी कामगारामार्फत करायचे असे सांगून काम बंद पाडले व सदरचे काम करायचे असेल तर आम्हाला माथाडी म्हणून सदर कामाचे काही रक्कम आम्हाला दयावी लागेल, असे धमकावून कंपनीचे संचालकाकडून ३५,०००/- रू., ९०,०००/- रू., ३५,०००/- रू. असे वेळोवेळी धमकावून एकूण १,६०,०००/- रू. खंडणी स्वरूपात घेतले, वगैरे हकीकत नमूद कंपनीचे संचालक यांनी पोलीस स्टेशनला येवून वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे शहर कडील श्री. मदन बहाद्दरपुरे यांना सांगितल्याने, त्यांनी तात्काळ सदर तक्रारीची दखल घेतली व वरील माथाडीचे नावाखाली खंडणी मागणारे वरील इसम नामे बाबू ननावरे, गोविंद गायकवाड, गौतम जगदाळे यांचेविरूद्ध खंडणी मागितलेबाबतचा व जीवे मारण्याची धमकी दिलेबाबतचा गुन्हा दाखल करण्यात आहे. श्री.मदन बहाद्दरपुरे यांचे बातमीवरून नमूद गुन्हयातील बाबू ननावरे, गोविंद गायकवाड, गौतम जगदाळे यांना अटक करण्यात आलेली आहे. नमूद आरोपींवर खडणी, घरफोडी, दरोडा इ. गंभीर गुन्हे दाखल आहेत व त्यांनी आणखीन पुणे शहरातून माथाडीचे नावाखाली खंडणी घेतली आहेत, अगर कसे, याबाबतचा तपास चालू आहे.

नमूदची कारवाई ही मा. श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा. डॉ.प्रीती टिपरे, सहा. पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे व पो.स्टे.कडील तपास पथकातील दिनेश शिंदे, तुकाराम शिंदे, विनोद साळुंके, रियाज शेख, निशीकांत सावंत, गणेश गायकवाड, अमोल सोनवणे व संदिप गायकवाड यांनी आरोपींना पकडून गुन्हा उघडकीस आणलेला आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास श्री. गणेश माने, पोलीस निरीक्षक, (गुन्हे) कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे शहर हे करीत आहेत.

(मदन बहाद्दरपुरे)

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे